ePaper

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पिंपरी-चिंचवडकरांशी ‘मन की बात’



दिशा सालीयान प्रकरण : आदित्य ठाकरे न्यायालयात जाण्याच्या तयारीत

| वर्ष - 6 | अंक - 252 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दि. २६ डिसेंबर २०२२ | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- भारत २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याचा संकल्प : पंतप्रधान मोदी
- भाजपा शहराध्यक्ष बदला अन्यथा अवघड, माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर
- ...तर खून करणे वाईट नाही : कालिचरण महाराज उवाच!


# ‘शास्ती’ चे भूत कुणाचे ?

## पिंपरी-चिंचवडकरांचा सवाल : राष्ट्रवादीला बोलण्याचा नैतिक अधिकार आहे काय?

। पिंपरी । । महाईन्यूज ।
। सुनील आढाव ।

पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांवर शास्तीकर लादण्यात आला. त्यावेळी शहरात आणि राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता होती. गेल्या १४ वर्षांत हा प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरलेल्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी शास्तीकर माफीच्या निर्णयावर आकसवृत्तीने टीका-टिप्पणी सुरू केली आहे. मात्र, यामुळे शहराचे नुकसान होत आहे. ज्या राष्ट्रवादी काँग्रेसने पिंपरी-चिंचवडवर शास्तीकर लादला. त्यांच्या पदाधिकाऱ्यांना शास्तीकर माफीच्या निर्णयावर बोलण्याचा नैतिक अधिकार आहे काय? असा सवाल पिंपरी-चिंचवडकरांकडून उपस्थित केला जात आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवडमधील शास्तीकर माफीबाबत भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधी मांडली. यावर मुख्यमंत्री एकनाथ पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमधील शास्तीकर माफीची घोषणा केली.

शहरवासींच्या मानगुटीवर बसलेले भूत १४ वर्षांनंतर उतरले, याबाबत राष्ट्रवादीसह विरोधी पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी या घोषणेचे मोठ्या मनाने स्वागत करणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाले नाही. भाजपा आणि शिंदे गट वगळता सर्वच विरोधकांनी शास्तीकर माफीच्या निर्णयावर सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी शास्तीकर माफी होणार नाही. ही केवळ घोषणाच असेल. भाजपा जुमलेबाज पार्टी आहे, अशा शब्दांत टिका केली. वास्तविक, गव्हाणे यांनी या मुद्दावर राजकीय समंजसपणा दाखवणे अपेक्षित होते.



दि. ४ जानेवारी २००८ रोजी तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने शास्तीकर लागू केला. त्यानंतर शास्तीकर माफ करु असे आश्वासन देणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केवळ “गाजर” दाखवले. याचेच प्रत्यंतर म्हणून २०१४ पासून झालेल्या शहरातील महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचा दारुन पराभव झाला. भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ हजार चौरस फुटापर्यंतच्या बांधकामांवरील शास्तीकर पूर्णमाफ केला होता. आता उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिक आणि लोकप्रतिनिधींची भूमिका लक्षात घेवून निवासी, औद्योगिक आणि व्यावसायिक शास्तीकर पूर्ण माफ करण्याची मोठा निर्णय घेतला. याचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांकडून स्वागत करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांना आकस निर्माण झाला आहे, असे चित्र यानिमित्ताने निर्माण झालेले पहायला मिळाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनीही प्रसारमाध्यमांकडे शास्तीकर म्हणजे जुमलेबाजी आहे, असा दावा करणारी माहिती दिली. त्यामुळे शास्तीकर सुटला यापेक्षा शहरातील विरोधी पक्षांना शास्तीकर भाजपामुळे सुटला याचा त्रागा झालेला पहायला मिळाला.

वास्तविक, राजकीय आकस आणि संकुचितपणा हा पिंपरी-चिंचवडच्या विकासाच्या वाटचालीत परवडणारा नाही. याउलट, शास्तीकर सरसकट माफीची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांनी एकोप्याने पुढे आले पाहिजे, अशी अपेक्षा आहे...

### राजकीय जोडे बाजुला ठेवण्याची आवश्यकता...

२०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आली. या सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रमुख घटक पक्ष होता. शहरातील पदाधिकाऱ्यांना अडीच वर्षे सत्तेत असताना शास्तीकरचा प्रश्न का सोडवता आला नाही. २०१४ पासून राष्ट्रवादीला सर्व निवडणुकांमध्ये पिंपरी-चिंचवडकरांनी सत्तेपासून बाजुला ठेवले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात प्रलंबित प्रश्न सोडवण्याची संधी असताना राष्ट्रवादीच्या नेत्यांनी वैयक्तिक कामे करुन घेण्यात धन्यता मानली. विकासकामे मार्गी लावण्याची संधी होती. त्यावेळी व्यावसायिक हितासाठी सत्तेचा वापर केला आणि पिंपरी-चिंचवडकरांना वाऱ्यावर सोडले, असे म्हणावे लागेल. यापुढील काळात शहरातील प्रमुख समस्यांबाबत सर्वपक्षीय नेत्यांनी राजकीय जोडे बाजुला ठेवून सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे, अशी भावना सामान्य पिंपंरी-चिंचवडकरांची आहे.

# महाराष्ट्र केसरी निवड चाचणी : चव्हाण, सस्ते विजयी

## कुस्ती शौकीनांची गर्दी : पुनावळेत रंगले सामने, 160 मल्लांचा सहभाग

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी ।

पिंपरी-चिंचवड कुस्तीगीर संघ आयोजित व वस्ताद आनंदराव बाजीराव बोरगे पाटील यांच्या स्मरणार्थ आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती निवड स्पर्धेत खुला गट माती विभागात संकेत चव्हाण (निगडी) यांने प्रतिस्पर्धी समाधान दगडे याचा दुहेरी डाव टाकत पराभव करून तर गादी विभागात प्रसाद सस्ते (मोशी) याने शेखर शिंदे याचावर मात करून विजय मिळवला.

या स्पर्धेत 160 मल्ल सहभागी झाले होते. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र, स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पिंपरी-चिंचवड कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वस्ताद ताराचंद भाऊसाहेब कलापुरे यांना जीवन गौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. जीवन गौरव पुरस्काराचे हे 17 वे वर्ष. या कुस्ती स्पर्धेला कुस्ती शौकीनांची गर्दी लोटली होती. या मल्लांना प्रोत्साहन देताना हलगीच्या तालावर प्रेक्षकांचा उचल उचल... टाक डाव... टाळ्या, शिट्यांनी जोरदार प्रतिसाद दिला. मल्लांना उपस्थित मान्यवरांकडून रोख बक्षिसे देण्यात आली.

पुनावळे येथील वै.ह.भ.प. गणपत दामोदर रानवडे गुरुजी क्रीडांगणावर स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी माजी खासदार विदुराजी तथा नानासाहेब विठोबा नवले, पिंपरी चिंचवड शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हनुमंत गावडे, उपाध्यक्ष विशाल कलाटे, हिंद केसरी अमोल बराटे, भारत केसरी विजय गावडे, विजय बराटे, खजिनदार दिलीप बालवडकर, खंडू वाळुंज, शंकर कंधारे, युवा महाराष्ट्र केसरी किशोर नखाते, मुंबई महापौर केसरी अजय लांडगे, राष्ट्रीय कुस्तीगीर अभिषेक फुगे यांच्या हस्ते आखाडा पूजन करण्यात आले. यानंतर हनुमंत गावडे, पै. रत्नेश बोरगे, श्रीधर वाल्हेकर, नाना काटे, वस्ताद सुरेश चव्हाण, विशाल आप्पा कलाटे आदी मान्यवरांच्या हस्ते वस्ताद ताराचंद भाऊसाहेब कलापुरे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



# भाजपा शहराध्यक्ष बदला अन्यथा अवघड

## माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर यांची मागणी : पुण्यात अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्ष बदलीच्या मागणीवरून भाजपमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक उज्वल केसकर यांनी शहराध्यक्ष तातडीने बदलावा, अशी थेट मागणी समाजमाध्यमातून केली आहे. शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांना वेळीच बदललेली नाही तर आगामी महापालिका निवडणूक जिंकणे अवघड आहे, असे केसकर यांनी म्हटले आहे. यानिमित्ताने शहराध्यक्ष बदलाची मागणीलाही पक्षातून जोर मिळण्याची शक्यता असून पक्ष नेतृत्व यासंदर्भात काय निर्णय घेणार, याकडे भाजप कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार जगदीश मुळीक यांच्याकडे भाजप शहराध्यक्षपदाची जबाबदारी आहे. गेल्या वर्षीपासून भाजप शहराध्यक्षपद बदलण्यात यावे, अशी मागणी सातत्याने काही कार्यकर्त्यांकडून करण्यात येत होती. त्यातच माजी नगरसेवक उज्वल केसकर यांनी समाजमाध्यमातून थेट शहराध्यक्ष पदाची जाहीर मागणी केल्याने भाजपमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे.

'भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात बदल करणे आता आवश्यक झाले आहे. आमदार सिद्धार्थ शिरोळे किंवा प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांना शहराध्यक्ष केले पाहिजे. नेतृत्वात बदल झाला नाही तर महापालिका निवडणुकीत भाजपचे अवघड आहे. जगदीश मुळीक यांना खासदारकी द्या आणि त्यांचे पुनर्वसन करा. पण शहराध्यक्षपद त्वरीत बदला. सिद्धार्थ शिरोळे हा योग्य उमेदवार आहे,' असे केसकर यांनी म्हटले आहे.

दरम्यान, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीतील अंतर्गत गटबाजी पक्षाच्या हिताची नाही, असा सूर भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

दुसरीकडे, शहर भाजपाला सक्षम स्थानिक नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे का? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

### पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाकडे कार्यकर्त्यांचे लक्ष...

भाजपमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने गटबाजी पुढे आली आहे. यापूर्वी शहर भाजपमध्ये गोपीनाथ मुंडे समर्थक आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी समर्थक असे दोन गट होते. शहराध्यक्षपद या दोन्ही गटात सातत्याने शीतयुद्ध पहावयास मिळाले होते. त्यानंतरच्या मधल्या काळात शहराचे नेतृत्व कोणी करायचे, यावरूनही दोन मोठ्या नेत्यांमध्ये वाद सुरू झाला होता. खासदार गिरीश बापट आणि विद्यमान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यातही यावरून शीतयुद्ध सुरू झाले होते. सध्या शहराचे नेतृत्व चंद्रकांत पाटील यांच्याकडे आले आहे. मात्र पक्षात अंतर्गत गटबाजी कायम असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे. शहराध्यक्ष बदलाची मागणी थेट झाल्याने पक्ष नेतृत्व यासंदर्भात काय निर्णय घेणार, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.



# पुण्याभोवती आता उभारताहेत सिमेंटची जंगले!

## गावठाणापासून 200 मीटरच्या आतील जमीन अकृषिक करण्याची मोहीम

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।



संभाव्य अकृषिक (नॉन ॲग्रिकल्चरल- एनए) जागांना मूल्यांकनानुसार महसूल आकारून या जागांना अकृषिक परवाना देण्यासाठी महसूल विभागच संबंधित जागा मालकांकडे जाणार आहे.

याबाबतचा शासन निर्णय प्रसृत करण्यात आला आहे. त्यानुसार कोणत्याही गावाच्या गावठाणापासून २०० मीटरच्या परिघातील जमीनधारकांना स्वतंत्र अकृषिक परवाना काढण्याची गरज लागणार नाही. महसूल विभागाकडून जागा मालकांना अकृषिक आकारणी व रूपांतरण कर भरण्याबाबत चलन पाठवण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी पुण्यात सुरू झाली असून संबंधितांनी अशा प्रकारची जमीन अकृषिक करून घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. त्यामुळे पुण्यालगत सिमेंटची जंगले फोफावणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कोणत्याही गावाच्या गावठाणापासून २०० मीटरच्या परिघातील आणि अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये विकासयोग्य झोनकरिता वाटप केलेल्या क्षेत्रातील कोणतीही जमीन देय रक्कम शासनजमा करून जागा अकृषिक करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी शनिवारी केले.

गावठाणापासून २०० मीटर क्षेत्रातील अशी जमीन त्या क्षेत्राला लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमांच्या अधीन राहून निवासी प्रयोजनासाठी अकृषिक वापरात रूपांतरित केल्याचे मानण्यात येणार आहे आणि ही जमीन रहिवासी प्रयोजनासाठी घोषित करण्यात आली आहे. आवश्यक रक्कम जमा केल्यानंतर जमीन अकृषिक करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी ही प्रक्रिया मोहीमस्तरावर राबविण्यात येणार असल्याने नागरिकांना या क्षेत्रात घर बांधणे किंवा इतर प्रयोजनासाठी नियमानुसार जमिनीचा उपयोग करणे शक्य होणार आहे. जमीन अकृषिक करण्यासाठी इतर कागदपत्रांची पूर्तता करण्याचीही आवश्यकता नाही. भोगवटादाराने रक्कम भरल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीत विहित केलेल्या नमुन्यात नकाशा (सनद) देण्यात येईल आणि त्यानुसार संबंधित जमीन अकृषिक झाल्याचे समजण्यात येईल. या योजनेंतर्गत जमीन आणि मिळकतधारकांनी तहसीलदारांकडे अर्ज करून जमीन अकृषिक करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी केले आहे.

# राज्यात तापमानाचा पारा घसरला; नाताळ आला गुलाबी थंडी घेऊन!

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

उत्तर भारतातील बहुतांश राज्यांत दाट धुके आणि तीव्र थंडीचा कडाका वाढला आहे. त्यामुळे या भागाकडून महाराष्ट्राकडे थंड वारे वाहू लागले आहेत. परिणामी शुक्रवारपेक्षा शनिवारी राज्यातील किमान तापमानात घट होऊन थंडी वाढली आहे. विशेषत: उत्तर महाराष्ट्रातील नाशिक भागात कडाक्याची थंडी पडली असून या ठिकाणी किमान तापमानाचा पारा १०.३ अंशांपर्यंत घसरला आहे. राज्याच्या इतर ठिकाणीही किमान तापमानाचा पारा घसरला असून नाताळ राज्यात गुलांबी थंडी घेऊन आला आहे.

पश्चिमी चक्रावाताच्या प्रभावामुळे उत्तर भारतात शीतलहर मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. परिणामी पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली, पश्चिम बंगाल, सिक्कीम ओरिसा, आसाम, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कडाक्याची थंडी तसेच दाट धुके पसरले आहे. हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार पुढील आठवडाभर या भागात कडाक्याची थंडी आणि दाट धुके राहणार आहे. त्याचा परिणाम म्हणून राज्यातही थंडी वाढू लागली आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेला तीव्र कमी दाबाचा पट्टा आता श्रीलंकेकडे सरकला आहे. त्यामुळे या पट्ट्याची तीव्रता कमी झाली आहे. परिणामी आता उत्तर भारताकडून राज्याकडे थंड वारे हळूहळू वाहू लागले आहे. त्यामुळे राज्यात थंडीचा पारा घसरण्यास सुरुवात झाली आहे. शनिवारी राज्यातील नाशिक भागाचे किमान तापमान कमी होऊन थंडीची तीव्रता वाढली आहे. पुणे आणि परिसरात देखील रात्रीच्या थंडीत वाढ होऊन किमान तापमान ११.६ अंशावर आले आहे, तर उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या आसपास राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

# भारत 2025 पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याचा संकल्प : पंतप्रधान मोदी



**पिंपरी। । महाईन्यूज । । प्रतिनिधी ।**

शतकानुशतकं आपल्या भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य घटक राहिलेल्या योगाभ्यास आणि आयुर्वेद या आपल्या शास्त्रांसमोर मात्र पुराव्यावर आधारीत संशोधनाचा अभाव, हे नेहमीचच एक आव्हान राहिलं आहे. 'सबका प्रयास' च्या या भावनेतूनच आपण 2025 सालापर्यंत भारताला क्षयरोग मुक्त करण्यासाठी काम करत आहोत, असा संकल्प देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

"मन की बात" या प्रसिद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून आज पिंपरी-चिंचवडमधील विविध क्षेत्रातील नागरिकांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद साधला. यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, उषा उर्फ माई ढोरे, सदाशिव खाडे, नानी घुले, नितीन लांडगे, राजेश पिल्ले, शंकर जगताप, हेमंतराव हरहरे, नितीन काळजे, राहुल जाधव, अमोल थोरात, राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, विजय फुगे, अमित गोरखे, नंदकुमार दाभाडे, चंद्रकांत नखाते, शत्रुघ्न काटे, संदिप कस्पटे, हर्षल ढोरे, संतोष कलाटे आदी उपस्थित होते. ऑटो क्लस्टर सभागृहात हा कार्यक्रम झाला. त्यासाठी शहरातील विविध क्षेत्रातील नागरिकांना निमंत्रित केले होते.

नागरिकांनी पंतप्रधानांशी संवादही साधला. 'मन की बात' कार्यक्रमाचे पश्चिम महाराष्ट्र समन्वयक अमित गोरखे म्हणाले की, 'मन की बात' कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून पिंपरी-चिंचवड शहराची निवड करण्यात आली. पंतप्रधानांचा 'मन की बात' कार्यक्रम जनमानसात प्रचंड प्रसिद्ध असून, दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी हा कार्यक्रम देशभरात प्रसिद्ध होत असतो. यामध्ये देशातील विविध क्षेत्रातील नागरीक सहभागी होत असतात. प्रत्येकी राज्यातील एखादे शहर लाईव्ह स्ट्रिमिंगद्वारे या कार्यक्रमामध्ये सहभागी होत असते. 'मन की बात' कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अॅड.मोरेश्वर शेडगे यांनी तर प्रास्ताविक पश्चिम महाराष्ट्र संयोजक अमित गोरखे यांनी केले. उपस्थितीतांचे आभार पिंपरी-चिंचवड संयोजक नंदकुमार दाभाडे यांनी व्यक्त केले.



## नागरिकांच्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया :

**शुभांगी होळकर म्हणाल्या की,** पंतप्रधान मोदी यांनी कोविड काळात संपूर्ण देशातील गरजू नागरिकांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले. माझे पती यांचीही नोकरी गेली होती. मोदींनी आता पुन्हा पाच वर्षांसाठी मोफत अन्नधान्य योजना आणली आणली आहे. याचा फायदा देशातील गोरगरीब नागरिकांना होणार आहे.

**पौर्णिमा दिंडे म्हणाल्या की,** माझे वडील कॅन्सरमुळे मृत्यूमुखी पडले. मात्र, योगासनांमुळे कॅन्सरसारख्या आजारावर मात करता येते, याची माहिती मिळाली. देशात मोदींच्या नेतृत्वाखाली आरोग्य क्षेत्रात चांगले काम सुरू आहे.

**तुळसा हक्के म्हणाल्या की,** महाराष्ट्रातील विषेशत: पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाज आहे. त्या आदिवासी समाजाची माहिती देताना त्यांनी घरगुती उद्योगांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाला मदत झाली, इतकी सूक्ष्म माहिती पंतप्रधान मोदी यांनी 'मन की बात'मधून मिळाली. त्यामुळे आम्हाला प्रोत्साहन मिळाले.

**डॉ. प्रताप सोमवंशी म्हणाले की,** स्तनाच्या कर्करोगाबाबत योगाचे महत्व पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. त्याप्रमाणे आयुर्वेदातील ज्ञानाचा पुराव्याधारित अभ्यास झाला, तर अॅलोपॅथीप्रमाणे जगभरात आयुर्वेदाचाही प्रचार-प्रसार होईल, असा सूचना मी 'मन की बात' मध्ये केली आहे. तसेच, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. प्रमोद कुबडे, डॉ. सुभाष निकम आणि डॉ. रमेश केदार यांनीही 'मन की बात' मध्ये सहभाग घेतला आणि आपली निरीक्षणे नोंदवली आहे.

### अटलजींना प्रत्येकाच्या हृदयात स्थान : पंतप्रधान

**आपली परंपरा आणि संस्कृती यांचं माता गंगेशी अतूट नातं, गंगाजल आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. संयुक्त राष्ट्रांनी 'नमामि गंगे' अभियानाचा समावेश हा पर्यावरणाचा पुनर्संचय करणाऱ्या जगातील पहिल्या दहा उपक्रमांमध्ये केला आहे. तसेच, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी हे देशाला असामान्य नेतृत्व देणारे महान राजकीय नेते होते. प्रत्येक भारतीयाच्या हृदयात त्यांना विशेष स्थान आहे. पायाभूत सुविधा, शिक्षण किंवा परराष्ट्र धोरण, त्यांनी प्रत्येक क्षेत्रात भारताला नव्या उंचीवर नेले, अशा भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या.**

**सरचिटणीस राजू दुर्गे म्हणाले की,** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगा जागतिक पटलावर प्रसिद्ध केला. योगामुळे माणूस सदृढ होतो. माणूस सदृढ झाला की, परिसर सदृढ होतो. याप्रमाणे मोदींनी भारताला सदृढ केले. जगाला योगाचे महत्व पटवून देणारे पंतप्रधान भारताला लाभले, हे आपले भाग्य आहे. त्यामुळे संपूर्ण देश मोदींच्या विचारांचे अनुकरण करतो.

# तरुणाच्या खूनप्रकरणी पाच तासांत चौघे जेरबंद

## जाधववाडी येथील बैलगाडा घाटात झाला होता खून

**।पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाचा खून करण्यात आला. चिखली जाधववाडी येथील बैलगाडा घाटात शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी पावणेसातच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी चिखली पोलिसांनी पाच तासात चौघांना जेरबंद केले आहे. सूरज ऊर्फ सोन्या संदीप शिंदे, असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्यांचा मित्र किशोर दत्तात्रय सोनवणे (१८, रा. जाधववाडी, चिखली) यांनी याप्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी आदित्य पाटोळे, विशाल पवार, गणेश लोंढे आणि एक अल्पवयीन मुलगा यांना अटक केली आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत बाबर यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी किशोर सोनवणे आणि त्यांचा मित्र सूरज शिंदे हे शुक्रवारी (दि.२३) सायंकाळी पावणेसातच्या सुमारास जाधववाडी येथील बैलगाडा शर्यत घाट येथे गप्पा मारत बसले होते. त्यावेळी आरोपी तेथे आले. सूरज शिंदे याच्याशी झालेल्या जुन्या भांडणाचा आदित्य पाटोळे याला राग होता. त्या रागातून आदित्य पाटोळे याने इतर आरोपींसह मिळून पालघन व तलवारीसारख्या लोखंडी पट्टीने मारून सूरज शिंदे याचा निर्घृण खून केला. त्यानंतर आरोपी पळून गेले होते.

आरोपी हे निघोजे परिसरात लपले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, चिखली पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने आरोपींचा निघोजे परिसरात शोध घेतला. आरोपी हे निघोज येथील बैलगाडा घाट येथे अंधाराचा फायदा घेऊन पळू लागले असता सहायक पोलिस निरीक्षक राकेश गुमाने व पथकाने अंधारात पाठलाग करून आरोपींना पकडले. चौकशी केली असता आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

सहायक पोलिस आयुक्त पद्माकर घनवट, चिखलीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत बाबर, पोलिस निरीक्षक राजेंद्र बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने ही कामगिरी केली.



## संपादकीय »

# सुपरफास्ट गडकरींचा विभाग संथ कसा?

***केंद्रिय रस्ते वाहतूक व महामार्ग कॅबिनेट मंत्री नितीन गडकरी नेहमी वेगवेगळे दावे करत असतात. मध्यंतरी ते म्हणाले की, 2024 पर्यंत भारतातले रस्ते अमेरिकेतील रस्त्यांसारखे होतील, असा दावा त्यांनी केला होता. मात्र आता त्यांच्याच सरकारच्या अहवालाने, त्यांनीच केलेल्या दाव्यावर प्रश्न उभे केले आहेत. त्यांच्याच खात्याचे प्रकल्प सर्वात जास्त विलंबाने सुरू झाले आहेत, असे अहवालातून निदर्शनास आले आहे.***

पायाभूत सोयी - सुविधा विभागात रस्ते वाहतूकचे आणि महामार्गच्या क्षेत्रात सर्वात अधिक 358 प्रकल्पांना विलंब झाला आहे. सरकारच्या या अहवालाप्रमाणे या विभागानं रेल्वे मंत्रालयाचे 111 प्रकल्प आणि पेट्रोलियम मंत्रालयाचे 87 प्रकल्पांना विलंब झाला आहे. निवडणूक प्रचारात, अनेक सभांमधून गडकरी आपल्या मंत्रालयात निधीची कसलीही कमी लसल्याचे जाहीर करतात. असे ते नेहमी म्हणताना दिसतात. मात्र प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. हा सरकारी अहवाल त्यांच्या महत्त्वकांक्षी स्वप्नांना ब्रेक लगवणारा ठरत आहे.

**नितीन गडकरी लक्ष्य काय़ ?**

नितीन गडकरी हे कायमच त्यांच्या वक्तव्यांमुळे चर्चेच्या केंद्रस्थानी असतात. त्यांच्या वेगवेगळ्या दाव्यांमुळे, कामांमुळे ते प्रसिद्धीच्या झोतात असतात. यावर्षीच्या मार्च महिन्या दरम्यान संसदेत त्यांनी देशातील जनतेला मोठे आश्वासन दिले होते. डिसेंबर 2024 येईपर्यंत भारतातले रस्ते,अमेरिकेशी बरोबरी साधतील, असे त्यांनी म्हंटले होते.

**रेल्वेच्या महत्त्वपूर्ण 111 प्रकल्पांना विलंब :**

रस्ते वाहतूक आणि तसेच महामार्ग क्षेत्रातील एकूण 769 पैकी तब्बल 358 प्रकल्प विलंबाने सुरू आहेत. रेल्वेतील 173 प्रकल्पांपैकी 111 प्रकल्प नियोजित वेळापत्रकाच्या मागे राहत आहेत. पेट्रोलियम क्षेत्रातील एकूण 154 प्रकल्पांपैकी 87 प्रकल्पही विलंबाने सुरू आहेत.

भारतीय राजकारणात भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्याकडे केंद्रातील मंत्रीमंडळात क्रमांक तीनचे प्रभावशाली मंत्री म्हणून पाहिले जाते. आतापर्यंत प्रभावी निर्णय क्षमता आणि कामाचा उरक यामुळे भारतीय जनमानसात गडकरींची प्रतिमा ‘कर्तव्यदक्ष’ अशी झाली आहे. मात्र, पायाभूत सोयी - सुविधा विभागात रस्ते वाहतूकचे आणि महामार्गच्या क्षेत्रात सर्वात अधिक 358 प्रकल्पांना विलंब झाला आहे, असे समोर आल्यामुळे गडकरींच्या मंत्रालयातील प्रशासकीय गतीमानताबाबत संशय निर्माण होवू लागला आहे, गडकरी याबाबत जातीने लक्ष घालतील आणि पुन्हा प्रलंबित प्रकल्प गतीमान होतील, अशी अपेक्षा करुयात...!



## आनंदी सकाळ

# नाम रूपाला व्यापून शिल्लक उरते

आपल्या माणसांचे जीवन खूप मोलाचे आहे. मानवी जीवनाच्या उत्पत्तीबद्दल इतिहासात अनेक वर्णने आहेत. या संदर्भात वैज्ञानिक आणि अध्यात्मिक विचारवंतांच्या विचारांमध्ये नेहमीच मतभेद राहिले आहेत. वैज्ञानिक बांधव मानव सोडून संपूर्ण सजीव जगाविषयी विज्ञानावर आधारित तथ्ये आणि संकल्पना प्रकट करतात. अध्यात्मिक विचारवंतांच्या दृष्टीने सर्व प्राणिमात्रांनी भरलेली ही सृष्टी दैवी शक्तीने चालवली जात आहे. जेव्हा मानवी विवेक स्थिर होऊन परिपक्वता प्राप्त होते, तेव्हा त्यात अध्यात्माशी सहमत होण्याचा गुण निर्माण होतो. या वैचारिक बदलाच्या परिस्थितीत, व्यक्ती स्वत: ला असे वाटते की ज्ञान आणि विज्ञानाची क्षमता अद्याप कोणालाही पृथ्वीवर अमर बनवू शकली नाही. विज्ञान सतत नवीन पॅरामीटर्ससह भौतिक जीवनाची व्याख्या करत असेल, परंतु मृत्यूनंतरचे रहस्य सोडवण्याची क्षमता त्याच्याकडे नाही. माणसाने आयुष्यात एकदा तरी त्याच्या मृत्यूनंतरच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे.

# कोरोनाची नवी लाट...




चीन, जपान आणि अमेरिकेत झपाट्याने वाढणाऱ्या कोरोना प्रकरणांमुळे आता भारतही अलर्ट मोडमध्ये आला आहे. चीनमध्ये दररोज ३ ते ४ हजार रुग्ण येत आहेत, तर जपानमध्ये हा आकडा लाखांवर पोहोचला आहे. जपानमध्ये गेल्या दिवशी कोरोनाचे सुमारे 2 लाख नवीन रुग्ण आढळले. जगभरात पसरलेला कोरोना पाहता भारतातही कोरोनाच्या चौथ्या लाटेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. भारतातील परिस्थिती सामान्य राहील असे तज्ज्ञांचे म्हणणे असले तरी या क्षणी घाबरण्याचे कारण नाही. दरम्यान, केंद्र सरकारसह राज्यांच्या सरकारांनी कोरोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. चला, जाणून घेऊया कोरोना प्रतिबंधाबाबत राज्यांची काय तयारी आहे.

**नवी दिल्ली :** जगात कोरोनाची वाढती प्रकरणे पाहता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी काल तातडीची बैठक बोलावली. बैठकीनंतर मुख्यमंत्री म्हणाले की, दिल्लीतील लोकांना सध्या घाबरण्याची गरज नाही. गेल्या वेळी ज्याप्रकारे ऑक्सिजनची कमतरता समोर आली होती, तशीच तयारी यावेळीही पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. केजरीवाल म्हणाले की, दिल्लीत सध्या BF7 चे एकही प्रकरण नाही. आमच्याकडे 8 हजार खाटा राखीव असून या वेळी या खाटांची संख्या 36 हजारांवर नेणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**महाराष्ट्र :** कोरोना को मात देने के लिए महाराष्ट्र सरकार ने भी कदम उठाने शुरू कर दिए हैं। महाराष्ट्र के डिप्टी सीएम देवेंद्र फडणवीस ने विधानसभा में बीते दिन ऐलान किया कि उनकी सरकार कोरोना पर निगरानी करने के लिए एक टास्क फोर्स बनाने जा रही है। इस बीच राज्य के स्वास्थ्य विभाग ने टेस्टिंग बढ़ाने और परीक्षण, ट्रैक, उपचार, टीकाकरण और कोविड प्रोटोकॉल का पालन करने का निर्देश दिया है।



**कर्नाटक :** कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि आरोग्यमंत्री के. सुधाकर यांनी आदल्या दिवशी राज्यातील कोरोना व्हायरसच्या परिस्थितीबाबत आढावा बैठक घेतली. बैठकीत कोरोना चाचणी आणि प्रोटोकॉल वाढविण्याबाबत सल्लागार जारी करण्यात आला आहे.

**उत्तरप्रदेश :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही कोरोनाबाबत तज्ज्ञांच्या टीमशी चर्चा केली. बैठकीत त्यांनी चाचण्या आणि डॉक्टरांची संख्या वाढवण्याबाबत चर्चा केली. तुम्हाला सांगतो की, आजपासूनच कोरोनाला रोखण्यासाठी राज्यात सर्व पोलिसांना मास्क घालणे बंधनकारक करण्यात आले आहे. पोलीस कर्मचाऱ्यांनाही शंभर टक्के लसीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.


भारतातील प्रमुख राज्यांतील सध्यस्थितीचा आणि तयारीचा विचार केला असता कोविड-१९ ची लाट आपल्या उंबरठ्यापर्यंत पोहोचली आहे, याचे भान सामान्य नागरिकांनी ठेवले पाहिजे.

# बाबा बर्फानीच्या पुजेची उत्सूकता

**कोणत्याही देशासाठी संविधान आवश्यक असते. देशाच्या कायद्याला संविधान म्हणतात. तो अधिनियमांचा संग्रह आहे. भारताच्या राज्यघटनेला जगातील सर्वात लांब लिखित संविधान होण्याचा मान आहे. भारतीय संविधान हा आपल्या देशाचा आत्मा आहे. आत्म्याचा शरीराशी जसा संबंध असतो तसाच संबंध देशाशी असतो.**

**संविधान दिनाचा इतिहास**

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताचे संविधान पूर्ण झाले. डॉ. भीमराव आंबेडकर हे संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असल्याने, भारत सरकारने 26 नोव्हेंबर 2015 रोजी त्यांचे 125 वे जयंती वर्ष म्हणून संपूर्ण देशात प्रथमच संविधान दिन साजरा केला. त्यानंतर दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. पूर्वी हा राष्ट्रीय कायदा दिवस म्हणून साजरा केला जात होता. संविधान सभेने 2 वर्षे 11 महिने 18 दिवसात देशाचे संविधान पूर्ण केले. त्यावर 114 दिवस चर्चा झाली आणि 12 सत्रे आयोजित करण्यात आली. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च झाले. भारतीय राज्यघटनेत 11 डिसेंबर 1946 रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची कायमस्वरूपी राष्ट्रपती म्हणून नियुक्ती करण्यात आली. भारतीय राज्यघटनेवर




284 जणांनी स्वाक्षरी केली होती. 26 नोव्हेंबर 1949 रोजी ते पूर्ण झाले आणि राष्ट्राला समर्पित करण्यात आले. यानंतर 26 जानेवारी 1950 पासून देशात संविधान लागू करण्यात आले. यापूर्वी देशात भारत सरकार कायदा-1935 हा कायदा लागू होता. काहीही परिपूर्ण नाही. काळानुसार त्यात बदल होत राहतात. भारतीय राज्यघटना अंमलात आल्यानंतर त्यात 100 हून अधिक दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. भविष्यातही असेच घडण्याची शक्यता आहे.

भारतीय राज्यघटनेत सरकारच्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि नागरिकांचे अधिकार सविस्तरपणे सांगितले आहेत. संविधान सभेच्या एकूण सदस्यांची संख्या 389 होती. त्यापैकी 292 ब्रिटिश प्रांतांतील 4 मुख्य आयुक्त होते, तर 93 सदस्य संस्थानिकांचे होते. विशेष म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यानंतर संविधान सभेचे सदस्य देशाच्या संसदेचे पहिले सदस्य झाले. देशाची संविधान सभा ही केवळ भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीसाठी निवडण्यात आली होती. भारतीय राज्यघटनेनुसार केंद्रीय कार्यकारिणीचे घटनात्मक प्रमुख राष्ट्रपती असतात. १९ जुलै १९४६ रोजी भारतीय राज्यघटनेची रचना करणाऱ्या संविधान सभेची स्थापना करण्यात आली. संविधानातील काही कलम २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पारित करण्यात आले, तर उर्वरित कलम २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले.

या संविधानाने सर्व भारतीय अधिकार दिले. त्याचा आपण आदर केला पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ...तर खून करणे वाईट नाही : कालिचरण महाराज उवाच!

। औरंगाबाद । महाईन्यूज ।



राष्ट्रपिता महात्मा गांधींबद्दल अपशब्द उच्चारणाऱ्या कालीचरण महाराज यांनी आणखी एक वादग्रस्त विधान केले आहे. आपले सर्व देवी-देवता हिंसक आहेत. म्हणूनच आपण त्यांची पूजा करतो. देश आणि धर्मासाठी खून करणे वाईट नाही, असे कालीचरण महाराज म्हणाले आहेत. याबाबतचे वृत्त एका नामांकित वृत्तवाहिनीने दिले आहे.

"आपले सर्व देवी-देवता हिंसक आहेत. आपले देवी-देवता मारामारी करणारे आहेत म्हणूनच आपण त्यांची पूजा करतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्यासाठी मारामारी केली नसती तर आपण त्यांची पूजा केली असती का? छत्रपती संभाजी महाराज, गुरुगोविंद सिंह महाराज, राणा प्रतापजी महाराज यांनी आपल्यासाठी मारामारी केली नसती तर आपण त्यांची पूजा केली असती का?" असे सवाल कालीचरण महाराज यांनी केले आहेत.

"आपले सगळे देवी-देवता हिंसक आहेत. उद्देश देश, धर्मासाठी असेल तर खून करणे काही वाईट नाही," असेही कालीचरण महाराज म्हणाले आहेत.

### वादग्रस्त वक्तव्याबाबत पूर्वी गुन्हा दाखल...

**दरम्यान, यापूर्वी कालीचरण महाराज यांनी महात्मा गांधी यांच्याबद्दल बोलताना शिवराळ भाषेचा वापर केला होता. तसेच गांधीजींना शिवीगाळ करताना मारेकरी नथुराम गोडसेला वंदनही केले होते. याबाबतची एक व्हिडीओ क्लीप समाजमाध्यमांवर व्हायरल झाली होती. याप्रकरणी कालीचरण महाराजांविरोधात गुन्हा दाखल आहे.**

# आदित्य ठाकरे तुला सोडणार नाही : नारायण राणे



। मुंबई । महाईन्यूज ।

बॉलिवूड अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियनचा काही महिन्यांपूर्वी मृत्यू झाला होता. तिने आत्महत्या केली की तिच्यासोबत घातपात घडला? याबाबत अद्याप संभ्रम आहे. दिशाच्या मृत्यूनंतर सुशांतसिंह राजपूतही राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता. दोघांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघालं होतं. या प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले होते.

या प्रकरणामध्ये शिवसेना नेते आदित्य ठाकरेंचा हात आहे, असा आरोप केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते नारायण राणे यांनी यापूर्वी केला होता. यानंतर आता राणेंनी पुन्हा एकदा आदित्य ठाकरेंवर आरोप केले आहेत. दिशा सालियनवर तू अत्याचार केला. तिची हत्या केली, तुला सोडणार नाही, असं विधान नारायण राणेंनी केलं आहे. ते सिंधुदुर्ग येथे एका कार्यक्रमात बोलत होते. आदित्य ठाकरेंवर टीकास्त्र सोडताना नारायण राणे म्हणाले, "सुशांतसिंह राजपूत आणि दिशा सालियानचं नाव आलं की आदित्य ठाकरे चवताळले. आज नाहीतर उद्या... पण तुला तुरुंगात नक्की पाठवणार. दिशा सालियन या एका भारतीय आणि महाराष्ट्रीयन मुलीवर तू अत्याचार केला आहे, तू हत्या केली आहे. त्यावेळी आदित्य ठाकरे तिथं उपस्थित होते.

तुला सोडणार नाही. आता भाजपा आणि शिंदे गटाची सत्ता आहे, एवढं लक्षात ठेवा" असा गंभीर इशारा नारायण राणे यांनी दिला आहे. यापूर्वीही नारायण राणेंनी आदित्य ठाकरेंवर या प्रकरणावरुन आरोप केले होते

# मी दूधखुळा नाही : अजित पवार संतापले


। मुंबई । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासंदर्भात विचारलेल्या एका प्रश्नामुळे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधी पक्षनेते अजित पवार पत्रकारांवर चांगलेच संतापल्याचं चित्र शनिवारी अमरावतीमध्ये पहायला मिळालं. शरद पवार हे अजित पवारांवर नाराज असल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पत्रकाराने अजित पवारांना प्रश्न विचारला असता त्यांनी चिडूनच या प्रश्नाला उत्तर दिलं.

शरद पवार नाराज आहे असं बोललं जात आहे, असं म्हणत पत्रकाराने चर्चांवर अजित पवारांचं मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पत्रकाराच्या तोंडून हे वाक्य ऐकताच अजित पवारांनी चिडूनच, "हे धादांत खोटं आहे. कोण या कांड्या पेटवतं? तुम्हाला कोणी सांगितलं? पवारसाहेबांनी फोन करुन सांगितलं?" असे प्रतिप्रश्न पत्रकाराला केले. तसेच त्यांनी, "तुम्ही पत्रकार आहात तुम्हाला प्रश्न विचारायचा अधिकार आहे पण मी तर रोज साहेबांच्या संपर्कात असतो. आपल्या ज्ञानामध्ये अशी कोणी भर घातली?" असं म्हणत पत्रकाराला सुनावलं.

# अभिनेत्री तनूषा शर्माची गळफासाने आत्महत्या

। मुंबई । महाईन्यूज ।



छोट्या पडद्यावरील अभिनेत्री तुनिषा शर्माने शनिवारी (२४ डिसेंबर) दुपारी मालिकेच्या सेटवरच गळफास घेत आत्महत्या केली. यानंतर एकच खळबळ उडाली. ती सोनी सब टीव्हीवरील 'अलिबाबा: दास्तान ए काबुल' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत होती. तिच्या आत्महत्येविषयी अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. आता पोलिसांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव म्हणाले, "तुनिषा शर्मा अलिबाबा मालिकेतील अभिनेत्री आहे. तिने शुटिंग सुरू असतानाच स्टुडिओमध्ये गळफास लावून आत्महत्या केली. पोलिसांनी तुनिषाच्या आईच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा सहकलाकार शीजान खानला अटक करण्यात आली आहे. शीजानचे तुनिषाबरोबर प्रेमसंबंध होते. या प्रेमाच्या नैराश्येतूनच तुनिषाने ही आत्महत्या केली असं तिच्या आईचं म्हणणं आहे."

# अत्याचाराची तक्रार करणाऱ्या महिलेचा दाऊद गँगशी संबंध? : शेवाळेंच्या दाव्याने खळबळ

। मुंबई । महाईन्यूज ।

शिंदे गटाचे नेते तथा खासदार राहुल शेवाळे यांनी अभिनेता सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणात ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. या दाव्यानंतर ठाकरे गटातील नेते शेवाळे यांच्याविरोधात आक्रमक झाले आहेत. तसेच शेवाळेंच्या या दाव्यानंतर त्यांच्याविरोधात एका महिलेने अत्याचाराची केलेली तक्रार पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. शेवाळे यांच्याविरोधात तक्रार करणाऱ्या महिलेला मुंबईत यायचे असून तिला संरक्षण द्यावे, अशी मागणी ठाकरे गटातील नेत्या मनिषा कायंदे यांनी केली आहे. हे प्रकरण चर्चेत आल्यानंतर राहुल शेवाळे यांनी आज (२५ डिसेंबर) पत्रकार परिषद घेत



तक्रार करणाऱ्या महिलेचा दाऊग गँग आणि पाकिस्तानशी संबंध असल्याचा दावा केला आहे.

"तक्रारदार महिलेचा एक पाकिस्तानी ग्रुप आहे. या महिलेच्या गँगमध्ये एक फराह नावाची पाकिस्तानी महिला आहे. तसेच राशीद म्हणून एक पाकिस्तानी एजंटही आहे. तक्रारदार महिला दाऊद गँगसोबत काम करते. तिचा दाऊद गँगशी संबंध आहे. जावेद छोटानी, रईस हे दाऊदसोबत काम करतात. या दोघांशी तक्रारदार महिलेचे संबंध आहेत. त्यामुळे हे प्रकरण छोटे नाही. हा संपूर्ण आतंरराष्ट्रीय कट आहे," असा दावा राहुल शेवाळे यांनी केला.

"माझ्याविरोधात तक्रार करणारी महिली ही फराहबरोबर दोन वेळा पाकिस्तानला जाऊन आलेली आहे. या महिलेचे दाऊद आणि पाकिस्तानशी कनेक्शन आहे. दाऊद गँगशी संबंध असलेल्या महिलेला युवासेनाप्रमुख पाठीशी घालत आहेत. मला आयुष्यातून उठवण्याचे काम युवासेनाप्रमुखांनी केलेले आहे. राष्ट्रवादी पक्षदेखील याच्या पाठीशी आहे. राष्ट्रवादी पक्षाचे नेते नवाब मलिक यांचा दाऊदशी संबंध असल्यामुळे आज तुरुंगात आहेत. या महिलेचा अन्सारी नावाचा वकील आहे. या वकिलासोबत एक एजन्ट बोलत असताना नवाब मलिक यांचा उल्लेख करत आहे. माझ्याकडे भरपूर पुरावे आहेत," असा दावा राहुल शेवाळे यांनी केला.

### संबंधित महिलेची गुन्हेगारीची पार्श्वभूमी?

**दरम्यान, राहुल शेवाळे यांनी महिलेने अत्याचाराचे केलेले आरोप खोटे असल्यादा दावा केला आहे. तसेच या महिलेची कुटुंबाचा गुन्हेगारी स्वरुपाचा इतिहास आहे. एक भाऊ खुनाच्या आरोपात तुरुंगात आहे. तर दुसरा भाऊ ड्रग्ज तस्करी करतो असे शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. दरम्यान, शेवाळे यांच्या या आरोपानंतर वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.**

## शॉर्ट न्यूज »

### भारत जोडो तोडण्यासाठी नाही, तर जोडण्यासाठी : कमल हसन

।नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

अभिनेते कमल हासन यांनी आज भारत जोडो यात्रेत उपस्थिती दर्शवली होती. भारत जोडो यात्रा दिल्लीत पोहचली आहे. त्यानंतर अभिनेते कमल हासन हे देखील या यात्रेत सहभागी झाले. यावेळी त्यांनी केलेलं वक्तव्य चर्चेत आहे.

मला अनेकांनी विचारलं की तुम्ही इथे (भारत जोडो यात्रेत) का आलात? त्यांना सगळ्यांना सांगू इच्छितो की मी एक भारतीय म्हणून या ठिकाणी आलो आहे. माझे वडील काँग्रेसी होते. माझ्या विविध प्रकारच्या विचारधारा आहेत. तसंच माझा स्वतःचा एक राजकीय पक्षही आहे. मात्र जेव्हा प्रश्न देशाचा असतो तेव्हा सगळ्या राजकीय पक्षांच्या रेषा धूसर कराव्या लागतात. त्या रेषा धूसर केल्या आणि मी इथे आलो आहे असं यावेळी कमल हासन यांनी म्हटलं आहे. एवढंच नाही तर माझ्या आतल्या आवाजाने मला सांगितलं की कमल हाच तो क्षण आहे की ज्या क्षणी देशाला तुझी सर्वाधिक गरज आहे. भारत तोडण्यासाठी नाही तर जोडण्यासाठी तुला गेलं पाहिजे त्यामुळेच मी यात्रेत सहभागी झालो आहे असंही कमल हासन यांनी यावेळी म्हटलं आहे.

### केरळमध्ये कारचा भीषण अपघात

बंगळुरू। वृत्तसंस्था ।

केरळ-तामिळनाडूच्या सीमेवर झालेल्या अपघातात आठ भाविकांचा मृत्यू झाला आहे. कुमिली येथे शबरीमलाच्या भाविकांचा कारचा अपघात झाला. शुक्रवारी रात्री झालेल्या या अपघातात दोनजण जखमी झाले असून यामध्ये एका लहान मुलाचाही समावेश आहे. कुमिली-कंबम मार्गावर तामिळनाडूला पाणी वाहून नेणाऱ्या पहिल्या पेनस्टॉक पाईपजवळ ही घटना घडली. अपघातानंतर कार पाईपवर पलटी होऊन रस्त्यापासून सुमारे ४० फूट खोल खाली कोसळली. मिळालेल्या माहितीनुसार, चालकाचं नियंत्रण सुटल्याने कारचा अपघात झाला. कारमध्ये एकूण १० प्रवासी होती. शुक्रवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सर्व प्रवासी तामिळनाडूचे रहिवासी होती.

# बलुचिस्तानमध्ये बॉम्बस्फोटांची मालिका

## पाकिस्तानी पाच सैनिकांचा मृत्यू : 10 नागरिक जखमी



कराची। वृत्तसंस्था।

कराची : पाकिस्तानातील बलुचिस्तानमध्ये रविवारी बॉम्बस्फोटांची मालिका घडली आहे. यामध्ये पाच पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला असून अन्य १० नागरिक जखमी झाले आहेत. पाकिस्तानी मीडियानुसार, क्वेट्टा येथील सबजल रस्त्यावर ग्रेनेड स्फोट करण्यात आला. यावेळी दोन ग्रेनेडही रस्त्यावर फेकले. त्यातील एका ग्रेनेडचा स्फोट झाला, तर दुसरा ग्रेनेड निकामी करण्यात आला. या हल्ल्यानंतर स्थानिक पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून तपासाला सुरुवात केली आहे.

क्वेट्टा येथील सबजल रस्त्यावर झालेल्या ग्रेनेड हल्ल्यात जवळपास चार लोक जखमी झाल्याची माहिती 'एएनआय' वृत्तसंस्थेनं दिली आहे. क्वेट्टा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सबजल रस्त्यावर दोन ग्रेनेड (हातबॉम्ब) फेकण्यात आले होते. यातील एका ग्रेनेडचा स्फोट झाला तर दुसरा ग्रेनेड निकामी करण्यात आला.

या घटनाक्रमानंतर बलुचिस्तानचे मुख्यमंत्री अब्दुल कुदुस बिझेन्जो म्हणाले की, पोलीस आयुक्तांना शहरातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याआधीही पाकिस्तानात असे अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (TTP) ने अलीकडेच खैबर पख्तुनख्वा प्रांतातील बन्नू शहरातील दहशतवाद विरोधी विभागाचा परिसर ताब्यात घेतला. त्याचबरोबर दक्षिण-पश्चिम सीमेवर चकमकी आणि गोळीबाराच्या अनेक घटना घडल्या आहेत.

# चीनमधून येणाऱ्यांना आता करोना चाचणी अनिवार्य



**चीन, जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर व थायलंड या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांना 'आरटी-पीसीआर' चाचणी बंधनकारक**

गांधीनगर। वृत्तसंस्था।

चीन, जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर व थायलंड या देशांमधून भारतात येणाऱ्या प्रवाशांना करोनाशी संबंधित 'आरटी-पीसीआर' चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया यांनी शनिवारी येथे ही घोषणा केली.

या देशांमधून येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचे तापमान तपासले जाईल. करोनाची लागण झाल्याचे किंवा अथवा ताप असल्याचे आढळल्यास त्यांचे विलगीकरण करण्यात येणार आहे. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च' (एनआयपीईआर) च्या दीक्षांत सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी मंडाविया आले होते. त्यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी करोनाबाबत तयारीची माहिती दिली. ते म्हणाले की, प्रवाशांना आपली आरोग्याशी संबंधित स्थिती स्पष्ट करण्यासाठी 'एअर सुविधा' अर्ज भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. वाढत्या करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर चीन, जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि थायलंड येथून भारतात येणाऱ्या प्रवाशांना 'आरटी-पीसीआर' चाचण्यांचे अहवाल 'एअर सुविधा'वर टाकावे लागतील. शिवाय भारतात आगमन झाल्यानंतर त्यांचे तापमान तपासले जाईल. यापैकी कुणी करोना बाधित आढळल्यास किंवा ताप असल्याचे दिसल्यास त्यांना विलगीकरणात राहावे लागेल. या देशांसह हाँगकाँग, युरोप, अमेरिका आणि ब्राझीलसारख्या ठिकाणी करोना प्रादुर्भाव वाढत असल्याने केंद्र सरकार कोविड प्रतिबंधक पावले उचलत असल्याचे मंडाविया यांनी स्पष्ट केले.

शुक्रवारी करोनाप्रतिबंधासाठीच्या उपायांसाठी सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आली असल्याचे सांगून मंडाविया म्हणाले, की वर्तमानपत्रातील जाहिरातींद्वारे लोकांना जागरूक केले जात आहे. संसदेत दिलेल्या निवेदनात नागरिकांनी स्वत:हून मुखपट्टीचा वापर सुरू करण्याचे आवाहन केले होते. तसेच सामाजिक अंतर राखणे आणि कोविड प्रतिबंधासाठी सुयोग्य वर्तन असणेही आवश्यक आहे. अशा उपायांमुळे नव्या 'बीएफ-७' उत्परिवर्तित विषाणूला प्रतिबंध करता येईल, असे आरोग्यमंत्री म्हणाले.

# हिंदू मुलांना सांताक्लॉजलाची वेशभूषा करायला सांगू नका:

## विश्व हिंदू परिषदेचे शाळांना पत्र

नवी दिल्ली। वृत्तसंस्था।

संपूर्ण देशात आज नाताळचा सण साजरा केला जात आहे. भारतातही नाताळानिमित्त उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, या सणाला काही संघटनांकडून विरोध करण्यात येत आहे. दरम्यान, मध्य प्रदेशातील विश्व हिंदू परिषदेने शाळांना 'सनातन हिंदू' विद्यार्थ्यांना पालकांच्या परवानगीशिवाय सांताक्लॉजची वेशभूषा करण्यास आणि ख्रिसमस ट्री आणण्यास सांगू नये, असे म्हटले आहे.

विश्व हिंदू परिषदेने शनिवारी भोपाळमधील सर्व शाळांना पत्र लिहिले आहे. या पत्रात कोणत्याही शाळेने हिंदू विद्यार्थांना त्यांच्या पालकांच्या परवानगीशिवाय वेशभूषा करण्यास आणि ख्रिसमस ट्री आणण्यास सांगू नये, असं म्हटले आहे. तसेच हा प्रकार हिंदू संस्कृतीच्या विरोधात असून हे हिंदू धर्मातील विद्यार्थ्यांना ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित करण्याचे षडयंत्र आहे, असेही ते म्हणाले.

विश्व हिंदू परिषदेने मिशनरी नसलेल्या शाळांमध्ये 'ख्रिसमस डे' साजरा करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. "हिंदू मुलांना सांता बनवून शाळा ख्रिश्चन धर्माचा प्रचार करत आहे. आमच्या हिंदू मुलांना राम बनू द्या, कृष्ण बनू द्या, बुद्ध होऊ द्या, महावीर होऊ द्या, गुरु गोविंद सिंग होऊ द्या, पण सांता होऊ देऊ नका", असे ते म्हणाले. तसेच शाळा विद्यार्थ्यांना सांताक्लॉजची वेशभूषा करण्याचा आग्रह करत असेल, तर अशा शाळांविरोधात विश्व हिंदू परिषद कायदेशीर कारवाई करेल, अशा इशाराही या पत्रातून देण्यात आला आहे.






# अभिषेक-ऐश्वर्या घटस्फोटाची अफवाच!

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आणि पती अभिषेक बच्चन यांची जोडी ही लोकप्रिय जोड्यांपैकी एक आहे. ते दोघं सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे दिसते. सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहतात. त्या दोघांच्या आयुष्यात काय सुरु आहे हे जाणून घेण्याची त्यांच्या चाहत्यांची इच्छा असते. त्यात ऐश्वर्या ही नेहमीच चर्चेचा विषय ठरते.

अभिनेता अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय हे कपल बॉलिवूड चं प्रसिद्ध कपल आहे. नेहमी हे कपल कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतं. या दोघांचं लव्ह मॅरेज आहे. बी-टाऊनचं सर्वात आवडतं जोडपं म्हणजे ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिषेक बच्चन... दोघांनी त्यांचं पती-पत्नीचं नातं अतिशय सुंदरपणे जपलं आहे.

बॉलिवूडमध्ये अनेक जोडप्यांचं लग्नानंतर काही वर्षात घटस्फोट झालं... पण ऐश्वर्या आणि अभिषेकचं नातं लग्नाच्या 15 वर्षांनंतरही टिकून आहे. अनेक ठिकाणी दोघांना एकत्र स्पॉट देखील केलं जातं. सोशल मीडियावर देखील दोघांबद्दल कोणती गोष्ट समोर येईल या प्रतीक्षेत चाहते असतात. आता सुद्धा ऐश्वर्या आणि अभिषेकचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. बंटी और बबली या सिनेमा दरम्यान या दोघांमध्ये प्रेमाचे अंकुर खुलू लागले.



यानंतर या दोघांनी धूम या सिनेमात एकत्र काम केलं. या दोघांनी ऐकमेकांना डेट केल्या नंतर 'गुरू' सिनेमाच्या शुटिंग दरम्यान ऐश्वर्याने अभिषेकला लग्नाकरता प्रपोज केलं. या दोघांच्या १५ वर्ष पुर्ण झाली असून हे कपल सुखी आयुष्य जगत आहेत. मात्र सध्या हे कपल घटस्फोट घेणार असल्याचं बोललं जात आहे. मात्र हे सत्य नसून ही एक अफवा आहे.. नुकतीच अभिषेकने एक मुलाखत दिली ज्यात अभिषेक म्हणाला, ऐश्वर्या आणि माझं एकमेकांवर खुप प्रेम करतो. ऐश खूप सपोर्टिव्ह आहे. ती नेहमीच माझ्या वाईट काळातही माझ्यापाठिशी खंबीरपणे उभी असते." त्यामुळे त्यांची ही केमिस्ट्री पाहता त्यांच्यात सगळं काही छान सुरुये. मात्र समोर आलेली ही बातमी पुर्णपणे खोटी असून त्यात काहीच तत्थ नाहीये. यादोघांना 11 वर्षांची मुलगी आहे. जिचं नाव आराध्या असं आहे.



# सलमान खानने वाचवली अब्रु... प्रियांकाने स्वतःच केला खुलासा

बॉलिवूडची देसी गर्ल अभिनेत्री प्रियांका चोप्रा (PRIYANKA CHOPRA) ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. प्रियांका ही सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे दिसते. प्रियांका फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहते. काही दिवसांपूर्वी प्रियांकाचं अनफिनिश्ड हे पुस्तक प्रदर्शित झालं होते. यावेळी प्रियांकानं अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे. यावेळी प्रियांकानं तिच्या खासगी आयुष्याविषयी अनेक खुलासे केले आहेत. झूमनं दिलेल्या एका रिपोर्टनुसार, प्रियांकानं तिच्या पुस्तकात एका गाण्याच्या शुटिंगचा धक्कादायक किस्सा सांगितला. या गाण्यासाठी प्रियांकाला तिचे कपडे काढण्यास सांगितल्याचा खुलासा तिनं केला. खरं तर प्रियांकाला एक गाणं शूट करायचं होते. या गाण्यात प्रियांकाला तिचे कपडे काढावे लागणार होते. या गाण्याचं शूट करत असताना तिला तिची पॅन्टी दाखवण्यास सांगितलं. प्रियांका म्हणाली की, ते चार मिनिटांचं गाणं असल्यामुळे तिनं दिग्दर्शकाला सांगितलं की मी कपड्यांचे थर घालायला हवे. त्यावर उत्तर देत दिग्दर्शक म्हणाला की तू स्टायलिशची बोल. प्रियांका स्टायलिशकडे जाताच त्यानं सांगितलं की तिला तिचे पॅन्टी दाखवावी लागेल नाही तर प्रेक्षक चित्रपट पाहायला का येतील? हे ऐकून मी तो प्रोजेक्ट सोडला. जगात आपल्या यशावर आनंदी होणारे फार कमी लोकं असतात. या पॉडकास्टमध्ये माहितीसाठी प्रियांका म्हणाली, यशस्वी होण्यासाठी मी कोणतीही दानवी पूजा केलेली नाही.' यशाबद्दल रंगलेल्या अफवांबद्दल देखील प्रियांकाने स्पष्टीकरण दिलं. 'माझ्या करियरमध्ये काही अशी लोकं आली, ज्यांना कायम असं वाटायचं की मी अयशस्वी व्हावं. मला काम मिळू नये म्हणून देखील त्यांनी अनेक प्रयत्न केले. पण मी कधीही माघार घेतली नाही...'

प्रियांका चोप्रा लवकरच एव्हेंजर्सचे दिग्दर्शक रुसो ब्रदर्सच्या 'सिटाडेल' या वेब सीरिजच्या माध्यमातून चाहत्यांच्या भेटीस येणार आहे. याशिवाय प्रियांका 'लव्ह अगेन', 'जी ले जरा' या सिनेमांमध्ये देखील महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे..

# पोरी असाव्यात तर अशा...काजोल अन् बहिणीचा सुसंस्कृतपणा!

**बॉलिवूड अभिनेत्री काजोल ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. काजोल ही सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे दिसते. काजोल सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहते. नुकताच काजोलनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.**

काजोलनं हा व्हिडीओ तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केला आहे. या व्हिडीओत काजोल, तिची आई तनुजा आणि बहीण तनिषा दिसत आहे. या व्हिडीओतून त्या तिघांमधील बॉंडिंग पाहायला मिळत आहे. यावेळी काजोल आणि तिची बहीण तनिषानं मिळून त्यांची आई तनुजाला एक मोठी भेट दिली आहे. काजोल आणि तनिषानं मिळून त्यांच्या आईला लोणावळ्यात सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असा एक बंगला भेट म्हणून दिला आहे. काजोल आणि तनिषानं घेतलेल्या या बंगल्यावर गेल्या आठ महिन्यांपासून काम सुरु होतं. काजोल आणि तनिषानं त्यांच्या आईला बंगल्याविषयी कोणतीही माहिती दिली नव्हती. अचानक हा बंगला पाहिल्यानंतर तनुजा या आश्चर्यचकीत झाल्या. काजोल आणि तनिषानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या या व्हिडीओत त्या तिघी गाडीतून उतरताना दिसत आहेत. बंगल्याच्या बाहेर असलेली रीबीन कापतात आणि त्यानंतर बंगल्याचा मेन गेट उघडतात. बंगल्याचा दरवाज उघडल्यानंतर तनुजा या चप्पल काढून घरात जातात आणि पहिले पाया पडतात.



## शॉर्ट न्यूज »

### श्रावणी सावंतची ३२ व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड



**पिंपरी। महाईन्यूज ।**

क्रीडा कला विकास प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका कबड्डी संघाची कु. श्रावणी सावंत हिची ३२ व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. १५ ते १८ डिसेंबर दरम्यान, लातूर येथे संपन्न झालेल्या राज्य निवड चाचणी किशोर गट कबड्डी स्पर्धेतून कु. श्रावणी सावंत हिची भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने झारखंड येथे २७ ते ३० डिसेंबर दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय किशोर गट कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. दरम्यान, या खेळाडूचे बाळासाहेब खांडेकर (आयुक्त क्रीडा विभाग पीसीएमसी), अनिता केदारी (क्रीडा अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका), परशुराम वाघमोडे (प्रशासन अधिकारी क्रीडा विभाग), दीपक कन्हेरे (क्रीडा पर्यवेक्षक क्रीडा विभाग), अरूण फुगे (मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय थेरगाव), चंद्रशेखर कदम (मा. मुख्याध्यापक) यांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या. सदर खेळाडूस बन्सी आटवे (क्रीडा शिक्षक) व सोनाली जाधव यांनी मार्गदर्शन केले आहे.

### महाराष्ट्र क्रिकेट संघात वाकडच्या कन्येचा सहभाग

**पिंपरी। महाईन्यूज ।**

भारतीय क्रिकेट नियमक मंडळांतर्गत मुलींच्या पंधरा वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात परिनिता युवराज पाटील हिची निवड झालेली आहे. सलामी आक्रमक फलंदाज व विकेटकीपर म्हणून संघात स्थान पटकाविलेले आहे. सोमवार दि.26 पासून झारखंड येथील रांची व जयपूर येथे खेळविल्या जाणाऱ्या BCCI लीग मध्ये ती महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. परिनिताने वयाच्या पाचव्या वर्षापासून क्रिकेटचे धडे घ्यायला सुरुवात केलेली होती.



# भारतीय क्रिकेट संघाकडून चाहत्यांना नाताळ गिफ्ट!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

बांगलादेश विरुद्ध भारत यांच्यात दुसरा कसोटी सामना गुरूवारपासून (२२ डिसेंबर) ढाका येथे खेळला जात होता. मीरपूर कसोटीत टीम इंडिया संकटात सापडली होती. दोलायमान होत असलेल्या सामन्यात भारतीय संघाने यजमान बांगलादेशवर ३ गडी राखून संपूर्ण भारतवासीयांना ख्रिसमसची विजयी भेट दिली. रोमांचक झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात श्रेयस अय्यर आणि आर. अश्विनने झुंजार फलंदाजी करत भारताला विजय मिळवून दिला. ४५ धावांवर ४ गडी बाद असलेल्या भारताला चौथ्या दिवशी सकाळी सुरुवात केल्यानंतर मेहदी हसन मिराजने जबरदस्त हादरे दिले. मात्र अय्यर आणि अश्विन यांनी टीम इंडियाला विजयापर्यंत पोहोचवले. रविचंद्रन अश्विन ला सामनाविराच्या तर चेतेश्वर पुजाराला मालिकाविराच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

भारत या दुसऱ्या डावात १४५ धावांचा पाठलाग करण्यासाठी काल जेव्हा मैदानात उतरला तेव्हा त्यांची सुरुवात अतिशय खराब झाली होती. सलामीवीर कर्णधार लोकेश राहुल (२), चेतेश्वर पुजारा (६), शुबमन गिल (७) आणि विराट कोहली (१) हे झटपट बाद झाल्याने टीम इंडिया अत्यंत नाजूक स्थितीत आली होती. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारतीय संघाने ४ बाद ४५ धावांपर्यंत मजल मारली होती. तिथून पुढे आज चौथ्या दिवशी मैदानात उतरल्यानंतर अवघ्या २९ धावात ३ गडी गमावले.

तत्पूर्वी, या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा त्यांचा निर्णय पूर्णपणे बरोबर असल्याचे सामन्यातील परिस्थितीवरून दिसत होते, कारण भारतीय संघ धावांचा पाठलाग करताना अतिशय नाजूक अवस्थेत होता. यजमानांचा पहिलाच डाव २२७ धावसंख्येवर उरकला. दुसऱ्या डावातही त्यांना साजेशी कामगिरी करता आली नाही. संपूर्ण संघ अवघ्या २३१ धावांवर गारद झाला.

### खलील अहमद बाद झाला अन् भारत जिंकला..!

**चहापानापर्यंत लिटन दासने अर्धशतकी खेळी करत बांगलादेशला १९५ धावांपर्यंत पोहचवले होते.चहापानानंतर लिटन दास आणि टस्किन अहमदने आठव्या विकेटसाठी ६० धावांची भागीदारी रचत बांगलादेशला २०० च्या पार पोहचवले. मात्र अखेर मोहम्मद सिराजने लिटन दासला ७३ धावांवर बाद केले. दास बाद झाल्यानंतर बांगलादेशचा डाव लगेच संपेल असे वाटले होते. मात्र तस्कीन अहमदने फटकेबाजी करत बांगलादेशला २३१ धावांपर्यंत पोहचवले. अखेर खलील अहमद ४ धावांवर धावबाद झाला अन् बांगलादेशचा डाव २३१ धावांवर संपला. तस्कीन अहमदने नाबाद ३१ धावा केल्या. तत्पूर्वी, या सामन्यात बांगलादेशने पहिल्या डावात २२७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात ३१४ धावा केल्या होत्या.**



# करन पुन्हा पंजाबकडेच!

## आयपीएलमधील महागडा खेळाडू : चाहत्यांची उत्सुकता

**। कोची । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या आगामी हंगामापूर्वी झालेल्या खेळाडू लिलावात इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करनवर विक्रमी बोली लागली. पंजाब किंग्ज संघाने करनला १८.५ कोटी रुपयांत खरेदी केले. त्यामुळे तो ‘आयपीएल’ लिलावाच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. आपल्यावर इतकी मोठी बोली लागेल हे अपेक्षित नव्हते, अशी प्रतिक्रिया करनने व्यक्त केली.

“लिलावासाठी मी खूप उत्सुक होतो. त्यामुळे मला आदल्या रात्री फारशी झोप आली नाही. माझ्यावर इतकी मोठी बोली लागेल हे अपेक्षित नव्हते. मी खूप आनंदी आहे. पंजाबच्या संघाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांचा आभारी आहे,” असे करन म्हणाला.

करनने २०१९मध्ये पंजाबकडूनच ‘आयपीएल’मध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर तो चेन्नई सुपर किंग्ज संघाकडूनही खेळला. मात्र, आता पुन्हा पंजाबचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तो उत्सुक आहे. “चार वर्षांपूर्वी मला पंजाबच्या संघानेच ‘आयपीएल’मध्ये पदार्पणाची संधी दिली होती. त्यामुळे माझ्या ‘आयपीएल’मधील प्रवासाची जिथे सुरुवात झाली, तिथेच पुन्हा परतण्याची संधी मिळणार असल्याने मी खूप आनंदी आहे.

या संघात इंग्लंडचे काही खेळाडूही (जॉनी बेअरस्टो, लियाम लिव्हिंगस्टोन) आहेत. त्यांच्यासोबत खेळण्यासाठीही मी खूप उत्सुक आहे,” असे करनने सांगितले.